**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र.१४१७ /२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
श्री लक्ष्मणराव बापुराव कदम
मु.पो. मालेगाव ता.उमरखेड जि.यवतमाळ

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
भोकर जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा
रजा व प्रशिक्षण राखीव उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग
भोकर जि.नांदेड

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता गैरहजर आहे. श्री व्हि.बी.गट्टेरवार, जन माहिती अधिकारी तथा रजा व प्रशिक्षण राखीव उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर हजर आहे.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ नुसार दि.१८/११/१० रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागिय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर यांचेकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

*सा.बा.विभागाअंतर्गत येत असलेल्या कार्यालयात जानेवारी २००७ पासून विविध कामासाठी किती निधी प्राप्त झाला, तो निधी कोणकोणत्या कामासाठी कोठे खर्च करण्यात आला याची एम.बी. सह माहिती द्यावी. त्या कामावरील कनिष्ठ अभियंता व ठेकेदाराची नावासह माहिती देण्यात यावी. त्या कामासाठी काढण्यात आलेल्या टेंडरची सत्यप्रत देण्यात यावी. मंजुर कामाच्या ईस्टीमेटच्या सत्यप्रती देण्यात याव्या. कोणते काम पुर्ण झाले व कोणते काम अपुर्ण राहले ते सहकारण द्यावे.*

वरील माहिती प्राप्त न झाल्यामुळे अर्जदाराने प्रपत्र-ब नुसार दि.४/१/११ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या प्रथम अपीलामध्ये दि.२१/१/११

रोजी सुनावणी घेतली तेंव्हा अर्जदार हजर होते व जन माहिती अधिकारी तर्फे प्रतिनिधी श्री जी.डी.गीरी, शा.अ. हे हजर होते. उप अभियंता सा.बां.उपविभाग, भोकर यांनी शुल्क भरण्याबाबत १८/१२/१० ला अर्जदाराला कळविले त्यामुळे शुल्क भरण्याचे पत्र विहीत ३० दिवसाची मुदत संपल्यानंतर दिले असल्यामुळे सदर माहिती आता विनामुल्य अपिलार्थीस द्यावी लागणार आहे असे नमुद केले आहे. उपविभागिय अभियंता सा.बां.उपविभाग धर्माबाद यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून पाहण्यासाठी पत्र या कार्यालयास दिले आहे. तथापि अपिलार्थीने माहिती मागितली असल्यामुळे माहिती देण्याचे वेळकाढु प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास येते व सदर माहिती विनामुल्य ८ दिवसात देण्याची कार्यवाही करावी असे म्हटले आहे. उप विभागिय अभियंता, सा.बां.उपविभाग, भोकर यांनी १५०० पृष्ठांचे रु.३०००/- कळविल्यावरुन माहिती उपलब्ध असल्याचे दिसुन येते त्याकरीता सदर माहिती जन माहिती अधिकारी सा.बां.विभाग, भोकर कडे देण्यात यावी. अपिलार्थीने माहिती पाहण्याऐवजी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा रजा प्र.रा.उपअभियंता यांनी मागितलेली सर्व माहिती १५ दिवसात विनामुल्य देण्यात यावी असे विवेचनामध्ये म्हटले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणामध्ये असा निर्णय दिला की, अर्जदाराचे अपील मान्य करण्यात येत आहे व जन माहिती अधिकारी तथा रजा व प्र.रा.उपअभियंता, सा.बां.विभाग, भोकर यांनी अपिलार्थीस १५ दिवसाचे आत विनामुल्य परिपुर्ण माहिती द्यावी. सदर निर्णयाची प्रत अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा रजा व प्रशिक्षण राखीव उपअभियंता सा.बा.विभाग भोकर यांना ३/२/११ अन्वये पाठविण्यात आली. तसेच सदर निर्णयाची प्रत ३/२/११ अन्वये उपविभागिय अभियंता, सा.बां.उपविभाग, भोकर/धर्माबाद/बिलोली/माहुर क्र.१/२, किनवट/हदगाव यांना पाठविण्यात येवून त्यांनी अर्जदाराच्या दि.१८/११/१० च्या अर्जातील त्यांचेकडील संपुर्ण माहिती १० दिवसाचे आत कार्यालयास सादर करावी असे नमुद केले होते.

त्यानंतर अर्जदाराने औरंगाबाद खंडपीठाकडे दि. ११/५/११ ला द्वितीय अपील दाखल केले. अर्जदार तथा अपिलार्थी हा अमरावती विभागातील रहिवाशी असल्यामुळे अर्जदाराचे सदरचे अपील औरंगाबाद खंडपीठाकडुन या आयोगाकडे हस्तांतरीत करण्यात आले व सदर अपील दि.२/६/११ ला या आयोगाकडे नोंद करण्यात आले. माहिती न दिल्यामुळे अपील करत असल्याचे अर्जदाराने नमुद केले. सदर अपीलाची आज सुनावणी ठेवली असता श्री विजयसिंह गहेरवार, जन माहिती अधिकारी तथा रजा व प्रशिक्षण राखीव उपअभियंता, सा.बां.विभाग भोकर हे हजर आहेत व त्यांनी दि.३/१/१२ अन्वये लेखी खुलासा दाखल केला त्यात संबंधित उप अभियंता व संबंधित शाखेतील कर्मचारी यांनी माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देवु शकलो नाही असे म्हटले आहे. तसेच संबंधित सर्व उप अभियंता व विभागिय कार्यालयातील संबंधित शाखा सांभाळणारे वरीष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक व शाखा अभियंता यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामूळे सर्व संबंधितांना पत्र क्र.६९३८ दि.३१/१२/११ अन्वये कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, भोकर यांनी **कारणे दाखवा नोटीस** दिलेली आहे व त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी रेकॉर्डवर दाखल केली आहे. अर्जदाराला अद्याप माहिती पुरविण्यात आलेली दिसत नाही.

सदर प्रकरणामध्ये कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, भोकर यांना आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी वरील प्रकरणामध्ये चौकशी करावी व कार्यकारी अभियंता यांचा प्रथम अपीलातील आदेश जा.क्र./प्रलि/माअ/५३३ दि.३/२/११ नुसार ज्या उपविभागिय अभियंता यांना अर्जदाराचे अर्जामधील त्यांचेकडील संबंधित माहिती कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयास १० दिवसामध्ये सादर करण्याबाबत निर्देशीत केले होते परंतु ज्यांनी ती सादर केली नाही याबाबत तसेच दि.३१/१२/११ च्या कारणे दाखवा नोटीस नुसार ज्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन माहिती/खुलासा प्राप्त झाला नसेल त्या सर्वासंबंधी सविस्तर शहानिशा करावा व सदर प्रकरणामध्ये अर्जदाराने मागितलेली माहिती न पुरविण्यास जबाबदार असलेले जन माहिती अधिकारी तसेच सदर अधिनियमाचे कलम ५(५) नुसार जबाबदार सहा.जन माहिती अधिकारी म्हणुन इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर सदर कायदयातील तरतुदीचे उल्लंघन केल्याप्रकरणी जबाबदारी निश्चीत करावी. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(२) नुसार सर्व संबंधितांविरुध्द या आयोगाने शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस केली आहे असे समजुन सर्व संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, भोकर यांनी अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, नांदेड यांचेकडे हा आदेश मिळाल्यापासुन चार आठवडयामध्ये पाठवावा.

कार्यकारी अभियंता सा.बां.वि. भोकर यांचेकडुन सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ, नांदेड यांनी सर्व संबंधिताविरुध्द नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करावी व तसा अहवाल त्यानंतर तीन महिन्यामध्ये या आयोगास पाठवावा. तसेच जन माहिती अधिकारी तथा रजा व प्रशिक्षण राखीव उपअभियंता, सा.बां.विभाग, भोकर यांनी संबंधिताकडुन अर्जदाराच्या जोडपत्र-अ दि.१८/११/१० नुसार मागितलेली माहिती प्राप्त करुन ती अर्जदाराला हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसामध्ये विनामुल्य पाठवावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

## - **आदेश** -

१. कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, भोकर यांना आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी वर परिच्छेद ५ मध्ये निर्देशीत केल्यानुसार चौकशीसंबंधी कार्यवाही करावी व माहिती न पुरविण्यासाठी जे जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्या सर्वांवर जबाबदारी निश्चीत करावी व सर्व संबंधिताविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबधी शिफारस केल्यानुसार शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रस्ताव हा आदेश मिळाल्यापासुन चार आठवडयामध्ये अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, नांदेड यांचेकडे पाठवावा.

२. कार्यकारी अभियंता सा.बां.वि. भोकर यांचेकडुन शिस्तभंगाच्या कारवाईबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ, नांदेड यांनी सर्व संबंधिताविरुध्द नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करावी व तसा अहवाल त्यानंतर तीन महिन्यामध्ये या आयोगास पाठवावा.

३. जन माहिती अधिकारी तथा रजा व प्रशिक्षण राखीव उपअभियंता, सा.बां.विभाग, भोकर यांनी संबंधिताकडुन अर्जदाराच्या जोडपत्र-अ दि.१८/११/१० नुसार मागितलेली माहिती प्राप्त करुन ती अर्जदाराला हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसामध्ये विनामुल्य पाठवावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

वरीलप्रमाणे अपील निकाली काढण्यात येत आहे.

अर्जदार सुनावणीनंतर दुपारी १२.३० वाजता आयोगामध्ये हजर झालेत व माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी सांगितले. वरीलप्रमाणे आदेश पारीत केल्याबाबत व आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसामध्ये माहिती न मिळाल्यास या आयोगाकडे तक्रार करण्यासंबंधी अर्जदाराला सुचित करण्यात आले.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**प्रत कार्यवाहीकरीता - अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड.**

जिसकार/